## -: प्रेसनोट दिनांक- ०६/०८/२०१९ :-

### मारूती रामु खपले, वय ५४, तलाठी सजा माद्याळ, ता.कागल, जि.कोल्हापूर रा.कणेरी फाटा, ता. करवीर, जि.कोल्हापूर यांनी तक्रारदार यांचे ७/१२ उतारा दुरूस्तीकरीता रु.५०,०००/- लाच मागणी करुन तडजोडीअंती रू.४५,०००/-त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन रु.२५,०००/- लाच रक्कम स्विकारलेबाबत.

---

यातील तक्रारदार यांची आजी व चुलत आजोबा यांनी बेलेवाडी काळम्मा ता.कागल, जि.कोल्हापूर येथे ६५ गुंठे जमीन पुर्वी खरेदी केली आहे. त्या जमीनीचे ७/१२ उता-यामध्ये तक्रारदार यांचे चुलत आजोबा हे मयत झालेनंतर त्यांचे इतर ०५ वारसदार यांची सामाईक नोंद घेण्यात आली असून सर्व क्षेत्र सामाईक दाखविण्यात आले आहे. पंरतु तक्रारदार यांचे आजीचे नावे ३२.५ गुंठे व इतर ०५ जणांचे नावे ३२.५ गुंठे जमीन नोंद करून नवीन दुरूस्ती ७/१२ उतारा देणेकरीता तलाठी मारूती रामु खपले यांनी तक्रारदार याचेकडे ५०,०००/- रूपये मागणी केली होती.

त्यानुसार दिनांक ०४/०८/२०२० रोजी पडताळणी केली असता तलाठी मारूती रामु खपले यांनी तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडे ४५,०००/- रूपये मागणी करून त्यातील पहिला हप्ता म्हणुन २५,०००/-रूपये मागीतलेचे निष्पन्न झाले.

आज दिनांक ११/०८/२०२० रोजी बेलेवाडी काळम्मा, ता.कागल, जि.कोल्हापूर येथे सापळा कारवाई आयोजित केली असता, तलाठी मारूती रामु खपले यांनी तक्रारदार यांचेकडून पहिला हप्ता रू.२५,०००/-लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक मारूती रामु खपले, वय ५४, तलाठी सजा माद्याळ, ता.कागल, जि.कोल्हापूर रा.कणेरी फाटा, ता.करवीर, जि. कोल्हापूर यांचेविरुध्द मुरगुड पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोलीस निरीक्षक जितेंद्र पाटील, सहा.फौ.शाम बुचडे, पोहेकॉ शरद पोरे, सुरज अपराध, पोकॉ रुपेश माने, संग्राम पाटील अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४.

५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.